मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना मंत्रालयीन संवर्गासाठी राबविणेबाबत संनियंत्रण समिती गठीत करणे.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश, क्रमांक-सुकर्मी-२०१८/प्र.क्र.७२/१४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक - ३ मे, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय क्र.एस.आर.व्ही-२०१६/प्र.क्र.४३२/कार्या-१२, दि.२० मार्च, २०१८.

२. शासन निर्णय क्र.सुकर्मी-२०१८/प्र.क्र.७२/१४, दि.९ एप्रिल, २०१८.

शासन आदेश-

"मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना" दि.२० मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन संवर्गासाठी सन २०१८-१९ या वर्षाकरिता राबविण्यात येत आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत संनियंत्रण करण्यासाठी दि.९ एप्रिल, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. दि.९ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार मंत्रालयीन विभागातील दफ्तर तपासणीचे अधिकार संनियंत्रण समितीस आहेत. यासाठी समितीस पथक निश्चित करण्याचे अधिकार आहेत. त्यास अनुसरुन दफ्तर तपासणीसाठी खालीलप्रमाणे पथके तयार करण्यात येत असून त्यांना नेमून दिलेले विभाग खालीलप्रमाणे आहेत.:-

तपशिल	पथक-१	पथक-२	पथक-३	पथक-४
पथक रचना	श्री.शेलार, का.अ.१४ श्री.तरे,स.का.अ.-१४अ श्री.परब,लि.टं.	श्री.परब, का.अ.१४अ श्रीमती गांवकर, स.का.अ.-१४ब श्री.गोरे, लि.टं.	श्री.विरोळे, का.अ.१४ब श्री.पवार, स.क.अ.१४अ श्री.विरकर, लि.टं.	श्री.खताळ, अवर सचिव, श्रीमती.देवरे, क.अ. श्रीमती जोशी, स.क.अ.-कार्या-१४ श्री.बनसोडे, लि.टं.
	आवश्यकतेनुसार या पथकामध्ये इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे अधिकारअध्यक्ष, संनियत्रंण समिती यांना राहतील.			
दफ्तर तपासणीसाठी नेमून दिलेले विभाग	१)सामान्य प्रशासन विभाग २) संसदीय कार्य विभाग ३) गृह विभाग ४) महसूल व वन विभाग ५) कृषी व पदुम विभाग ६) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग ७) नगर विकास विभाग ८) वित्त विभाग	१)जलसंपदा विभाग २) विधी व न्याय विभाग ३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग ४) ग्राम विकास विभाग ५) अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण विभाग ६) नियोजन विभाग ७) सामाजिक न्याय विभाग ८)गृह निर्माण विभाग	१) सार्वजनिक बांधकाम विभाग २) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ३) सार्वजनिक आरोग्य विभाग ४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ५) आदिवासी विकास विभाग ६) पर्यावरण विभाग ७) सहकार व पणन विभाग ८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग	१)महिला व बाल विकास विभाग २) कौशल्य विकास विभाग ३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग ४) अल्पसंख्याक विकास विभाग ५) मराठी भाषा विभाग ६) वि.जा.भ.ज.व इ.मा.व वि.मा.प्र.विकास विभाग ७) मृद व जलसंधारण विभाग

सदर पथकांचे कामकाज खालीलप्रमाणे राहील.:-

१. सदर पथक संबंधित विभागास दफ्तर तपासणीसाठी दि.७मे,२०१९ ते २५ मे,२०१८ या कालावधीत भेट देईल.

२. सर्व आस्थापना अधिकाऱ्यांनी सदर पथकास सर्वोतोपरी सहकार्य करावे.

३. दफ्तर तपासणी पथक विभागामध्ये मुख्यमंत्री सुकर्मी योजना राबविण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेईल.

४. दफ्तर तपासणी पथक आपला अहवाल अध्यक्ष, संनियंत्रण समिती यांना सादर करेल.

५. दफ्तर तपासणी पथकाने अहवालामध्ये केलेल्या सूचनांबाबत सर्व विभागांनी कार्यवाही करणे आवश्यक राहील.

६. आवश्यकतेनुसार प्रत्येक विभागाची पुनर्तपासणी करण्याबाबत अध्यक्ष, संनियंत्रण समिती निर्णय घेतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१८०५०५१२०५३१५५०७ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.05.05 12:06:43 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई

५. सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य

६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव

७. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

८ सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.

९. सर्व सह /उप सचिव, मंत्रालयीन विभाग (आस्थापना), यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

१०. सर्व समिती सदस्य.

११. कार्यासन-१४/निवडनस्ती